# डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी,नागपूर

## मराठी विभाग

अहवाल: 2018-19

---

### मराठी वाङमय मंडळाचे उद्घाटन

दिनांक:- 07/08/18

डॉ. आंबेडकर महाविद्यालयातील दादासाहेब कुंभारे सभागृहात मराठी विभागातर्फे मराठी वाङमय मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून जेष्ठ विचारवंत व समीक्षक डॉ. वि. स. जोग होते. उद्घाटक म्हणून डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी , प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. रेखा वडीखाये, डॉ. इंद्रजित ओरके, मराठी विभगप्रमुख प्रा. दीपककुमार खोब्रागडे, मराठी वाङमय मंडळाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र तिरपुडे उपस्थित होते.

मराठीही आपल्या ज्ञानची आणि संस्कृतीची राजभाषा आहे जगात भाषेमुळेच त्या-त्या राष्ट्राची संस्कृती टिकून आहे. आपली संस्कृती टिकविण्यासाठी मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळविण्याची गरज आहे. असे प्रतिपादन डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. दीपककुमार खोब्रागडे यांनी केले. संचालन डॉ. रवींद्र तिरपुडे व आभार अंकित मालखेडे यांनी केले.


डॉ. आंबेडकर महाविद्यालय
दीक्षाभूमी, नागपूर
।। पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग ।।
मराठी वाङ्मय मंडळ
DR.AMBEDKAR COLLEGE
DEEKSHA BHOOMI,
NAGPUR


DR.AMBEDKAR COLLEGE
DEEKSHA BHOOMI,
NAGPUR


मराठी वाङ्मय मंडळ
DR.AMBEDKAR COLLEGE
DEEKSHA BHOOMI,
NAGPUR


DR.AMBEDKAR COLLEGE

# <u>व्यक्तिमत्व विकास एकदिवसीय कार्यशाळा</u>

दिनांक:- 11/09/2018

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथे मराठी विभागातर्फे व्यक्तिमत्व विकास या विषयावर एक दिवासीय कार्यशाळेचे आयोजन दिनांक 11 सप्टेंबर 2018 ला करण्यात आले होते. या कार्यशाळेत विद्यार्थांना डॉ. प्रभज्योत कौर यांनी व्यक्तिमत्व ही जीवनाची खरी ओळख असल्याचे सांगितले. अध्यक्षस्थानी मराठी विभागप्रमुख प्रा. दीपककुमार खोब्रागडे , मराठी वाङ्मय मंडळाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र तिरपुडे मंचावर उपस्थित होते. संचालन अंकित मालखेडे व आभार पवन कणोजे यांनी मानले.








# राष्ट्रीय चर्चासत्र

## विषय:- भारतीय संविधानाची अमलबजावणी व सुरक्षा

दिनांक:- 22/09/2018

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथील दादासाहेब कुंभारे सभागृहात "भारतीय संविधानाची अमलबजावणी व सुरक्षा" या विषयावर दिनांक 22 सप्टेंबर 2018 ला राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. सी. पवार, उद्घाटक म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे वकील फिरदोस मिर्झा, उच्च न्यायालयाचे वकित भुपेश पाटील, डॉ. शुद्धोधन कांबळे, मराठी विभागप्रमुख प्रा. दीपककुमार खोब्रागडे उपस्थित होते. संचालन डॉ. रवींद्र तिरपुडे व आभार देवानंद खोब्रागडे यांनी मानले.


डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, नागपूर
व
संविधान परिवार , मुंबई
यांच्या संयुक्त विद्यमाने
राष्ट्रीय चर्चासत्र




डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, नागपूर
व
संविधान परिवार , मुंबई
यांच्या संयुक्त विद्यमाने
राष्ट्रीय चर्चासत्र
DEEKSHA BHOOMI
NAGPUR


डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, नागपूर
व
संविधान परिवार , मुंबई
यांच्या संयुक्त विद्यमाने
राष्ट्रीय चर्चासत्र
DEEKSHA BHOOMI
NAGPUR


डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, नागपूर
व
संविधान परिवार , मुंबई
यांच्या संयुक्त विद्यमाने
राष्ट्रीय चर्चासत्र
NAGPUR


डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, नागपूर
व
संविधान परिवार , मुंबई
यांच्या संयुक्त विद्यमाने
राष्ट्रीय चर्चासत्र
NAGPUR

<u>मोडीलिपि एक दिवासीय कार्यशाळा</u>

दिनांक:- 6/1/2019

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर व जागतिक मोडी लिपि प्रसार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवासीय मोडीलिपी कार्यशाळेचे आयोजन दिनांक 6 जानेवारी 2019 ला महाविद्यालयातील दादासाहेब कुंभारे सभागृहात करण्यात आले. या कार्यशाळेत आंतरराष्ट्रीय मोडीलिपीचे अभ्यासक मा. नविनकुमार माळी यांनी मोडी भाषेची ओळख व मोडीलिपीचे प्रशिक्षण दिले. मा. भुपेश पाटील यांनी मिडिलिपीचे महत्व संगितले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मराठी विभागप्रमुख प्रा. दीपककुमार खोब्रागडे यांनी भूषविले. प्रास्ताविक डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. देवानंद खोब्रागडे व आभार अंकित मालखेडे यांनी मानले. या कार्यक्रमाला शहरातील पुरातत्व विभागाचे अधिकारी व विद्यार्थी उपस्थित होते.









<u>मराठी भाषा गौरव दिन</u>

दिनांक:27/02/2019

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथे मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिन दिनांक 27/02/2019 ला साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात मराठी विभाग प्रमुख प्रा. दीपककुमार खोब्रागडे, मराठी भाषा वाङमय मंडळाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन अंकित मालखेडे व आभार पवन कणोजे यांनी मानले.









महाराष्ट्र टाइम्स नागपूर ■ गुरुवार, ९ ऑगस्ट २०१८

# ...तर मराठीचे अस्तित्वच संपेल

**डॉ. श्रीपाद जोशी यांचा इशारा, मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन**

म. टा. प्रतिनिधी, नागपूर

'मराठी ही आपल्या ज्ञानाची आणि संस्कृतीची राजभाषा आहे. जगात भाषेमुळेच त्या त्या राष्ट्राची संस्कृती टिकून राहिली आहे. आपली संस्कृती टिकविण्यासाठी मराठी भाषेला लवकरात लवकर अभिजात भाषेचा दर्जा देण्याची गरज आहे. अन्यथा मराठी भाषेचे अस्तित्व १०० वर्षांत संपुष्टात येईल. मराठी भाषा टिकवायची असेल आणि मराठी संस्कृतीचे जतन करायचे असेल तर मराठीचे विद्यापीठ सरकारने स्थापन केले पाहिजे,' असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी केले. डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी येथे मंगळवारी डॉ. जोशी यांच्या हस्ते मराठी वाङमय मंडळाचे उद्घाटन झाले. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत व समीक्षक डॉ. वि. स. जोग होते.

विद्यापीठात मराठी भाषा अभ्यास मंडळाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल डॉ. रेखा वडीखाये यांचा सत्कार करण्यात आला तसेच, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात वाणिज्य, मराठी भाषा व इतर ज्ञानशाखेच्या अध्यक्षपदी डॉ. इंद्रजित ओरके यांची निवड झाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला.

डॉ. जोशी म्हणाले, 'संस्कृत भाषा भारतात बोलली जात नाही, तरी संस्कृत भाषेचा उदो-उदो केला जातो आणि संस्कृतसाठी विद्यापीठही स्थापन होते. परंतु, लाखो लोकांच्या मराठी भाषेचे विद्यापीठ नसणे ही खरी शोकांतिका आहे. आज भाषेच्या अस्तित्वाचा गंभीर प्रश्न उभा असून, ती टिकविण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची आहे.'

डॉ. वि. स. जोग म्हणाले, 'भाषेचे साहित्य ही अनुभूती, सहानुभूती आणि आकांक्षेतून निर्माण होते. कलावंताजवळ या तिन्ही गोष्टी असणे आवश्यक आहे. जातीवंत कलावंत हा दगडातून, मातीतून निर्माण होतो, तो आकाशातून पडत नाही.'

याप्रसंगी डॉ. रेखा वडीखाये व डॉ. इंद्रजित ओरके यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख प्रा. दीपककुमार खोब्रागडे यांनी केले. सूत्रसंचालन रवींद्र तिरपुडे यांनी, तर आभारप्रदर्शन वैशाली धनविजय यांनी केले. याप्रसंगी डॉ. देवानंद खोब्रागडे, राहुल मून, ओमप्रकाश पंचभाई, शंकर चांदेकर, प्रा. डॉ. प्रतिभा सिरीया, विकास सिडाम, विनित झामरे, सुजीत चव्हाण, अंकित मालखेडे आदींची उपस्थिती होती.



'मराठी वाङमय मंडळा'च्या उद्घाटनप्रसंगी संबोधित करताना डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी. व्यासपीठावर अन्य मान्यवर.

# मराठी आपल्या ज्ञानाची आणि संस्कृतीची राजभाषा

**डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांचे प्रतिपादन**

*प्रतिनिधी / ८ ऑगस्ट*

**नागपूर :** मराठी ही आपल्या ज्ञानाची आणि आपल्या संस्कृतीची राजभाषा आहे. जगात भाषेमुळेच त्या त्या राष्ट्राची संस्कृती टिकून आहे. आपली संस्कृती टिकविण्यासाठी मराठी भाषेला लवकरात लवकर अभिजात भाषेचा दर्जा देण्याची गरज आहे, अन्यथा मराठी भाषेचे अस्तित्व शंभर वर्षात संपुष्टात येईल. मराठी भाषा आज टिकवून ठेवण्यासाठी आणि मराठी संस्कृतीचे जतन करण्यासाठी मराठी भाषेचे विद्यापीठ सरकारने स्थापन करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात केले.

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी येथे अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्या हस्ते मराठी वाङ्मय मंडळाचे उदघाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्रातील ज्येष्ठ विचारवंत व समीक्षक डॉ. वि. स. जोग होते.

विद्यापीठात मराठी भाषा अभ्यास मंडळाच्या अध्यक्षपदी रेखा वडिखाये यांची नियुक्ती झाल्याबद्दल प्रमुख पाहुण्यांचे हस्ते त्यांचा शाल-श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात वाणिज्य, मराठी भाषा व इतर ज्ञानशाखेच्या अध्यक्षपदी डॉ. इंद्रजित ओरके यांची अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला. प्रा. दीपककुमार खोब्रागडे आपल्या प्रास्ताविकपर भाषणात म्हणाले, आज भांडवलशाही व्यवस्थेने इंग्रजी भाषेला राजमान्यता दिल्यामुळे मराठी भाषेवर भयानक असे संकट आहे. उत्पादनाची इंग्रजीतील जागतिक जाहिरातबाजी जोपर्यंत थांबत नाही तोपर्यंत इतर भाषेवरचे अराजकतेचे संकट दूर होणार नाही. आज जागतिकीकरणामुळे बोलीभाषा दहशतीच्या सावटाखाली जगत आहे. ही अराजकतेची प्रक्रिया आज थांबविणे गरजेचे आहे. मराठी भाषेला राजमानतेचा दर्जा देण्यासाठी सरकारने कायदा करावा व सगळी यंत्रणा मराठी भाषेत राबवावी, अशी मागणी त्यांनी केली.

ज्येष्ठ विचारवंत व समीक्षक डॉ. वि. स. जोग आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, भाषेचे साहित्य ही अनुभूती सहानुभूती आणि आकांक्षेतून निर्माण होते. कलावंतांजवळ या तिन्ही गोष्टी असणे आवश्यक आहे. जातीवंत कलावंत हा दगडातून, मातीतून निर्माण होतो. तो आकाशातून पडत नाही. वाचन हा लेखकाचा व्यायाम आहे. मार्क्स, फुले आणि आंबेडकर कठोर परिश्रमाने या जगात उदयाला आले. विद्यार्थ्यांनी या महापुरुषांचा आदर्श आज घेणे गरजेचे आहे.

याप्रसंगी डॉ. रेखा वडिखाये व डॉ. इंद्रजित ओरके यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला डॉ. देवानंद खोब्रागडे, राहुल मून, ओमप्रकाश पंचभाई, शंकर चांदेकर, प्रा. डॉ. प्रतिभा सिरीया, विकास सिडाम, विनित झामरे, सुजीत चव्हाण, अंकित मालखेडे तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालन रवींद्र तिरपुडे यांनी तर आभार वैशाली धनविजय यांनी मानले.



कार्यक्रमप्रसंगी डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, डॉ. वि. स. जोग, आदी मान्यवर

ePaper देशोन्नती Thu, 09 August 2018
deshonnati.digitaledition.in/c/31053490

# ‘व्यक्तिमत्त्व विकासा’वर एकदिवसीय कार्यशाळा

**लोकशाही वार्ता/ नागपूर**

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथे व्यक्तिमत्व विकासावर एक दिवासीय कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेचे उद्‌घाटन सुप्रसिद्ध अभ्यासिका डॉ. प्रभज्योत कौर यांनी केले.



अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध कवि व लेखक तसेच मराठी विभागप्रमुख प्रा. दीपककुमार खोब्रागडे होते.याप्रसंगी डॉ. प्रभज्योत कौर म्हणाल्या, व्यक्तिमत्व ही जीवनाची आयडेंटिटी असते. चांगले राष्ट्र आणि चांगला माणूस घडण्यासाठी व्यक्तिमत्वाचा सिंहाचा वाटा असतो. ज्या व्यक्तिजवळ सकारात्मक गुण असतील ते स्वतःला उत्तम घडंवू शकतात. आज जीवनाचा सकारात्मक विचार करणारी माणस सापडत नाही अशी खंत त्यांनी भाषणातून व्यक्त केली. आज भारतीय माणसात प्रचंड निराशा असून यातून जे व्यक्ति बाहेर पडले त्यांनीच स्वतःच्या जीवनाचा आणि समाजाचा विकास केला, असे त्या भाषणातून म्हणाल्या. त्यांनी व्यक्तिमत्व विकासासाठी अनेक आधारभूत मूलतत्वे सांगितली. व्यक्तिमत्व हा समाजाचा आरसा असतो. त्यासाठी उत्तम गुण आजच्या काळात असणारी माणसेच वर्तमानात टिकत असतात असे, त्या म्हणल्या. त्यांनी पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन द्वारे व्यक्तिमत्व विकासाची या कार्यशाळेत वेगवेगळी उदाहरणे दिली. व्यक्ति हा समाजाचा घटक असून नितीमूल्ये घडविणे ही आजच्या काळाची गरज असल्याचे त्यांनी उपस्थित विद्यार्थी व प्राध्यापक वर्गाला सांगितले.

सुप्रसिद्ध कवि व लेखक तसेच मराठी विभाग प्रमुख प्रा. दीपककुमार खोब्रागडे म्हणाले, चांगला लेखकच उत्तम साहित्य कलाकृती जन्माला घालतो. उत्तम लेखनासाठी उत्तम व्यक्तिमत्व असणे गरजेचे आहे. डॉ. आंबेडकर, मार्क्स, ओबामा, मार्टिन ल्यूथर किंग, रुसो, व्हाल्टेअर, बुद्ध, गुरुनानक, येशू ख्रिस्त हे उत्तम व्यक्ती असल्यामुळे त्यांचा आदर्श आजही समाज घेतो. या जगाला प्रतिभावंत व्यक्तींनीच घडविले, त्यांच्या योगदानामुळेच ही सृष्टि सुंदर दिसत आहे. कुरूप विचाराची माणसे समाज, राष्ट्र, धर्म आणि माणूस घडवू शकत नाही असे त्यांनी ठासून सांगितले. आजच्या विद्यार्थांच्या व्यक्तिमत्वाचा विकास झाला तरच तो या देशाचे उज्वल भवितव्य राहील असे त्यांनी प्रतिपादन केले आज देशात उत्तम व्यक्तिमत्वाचे राजकरणी समाजकारणी व धर्मकारणी सापडत नसल्याची खंत त्यांनी भाषणातून व्यक्त केली.

प्रास्ताविक मराठी वाङमय मंडळाचे संयोजक प्रा. रवींद्र तिरपुडे यांनी केले. संचालन प्रा. वैशाली धनविजय यांनी केले. तर आभार अंकित मालखेडे यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील वेगवेगळ्या विभागाचे प्राध्यापक व सर्व ज्ञानशाखेचे विद्यार्थी मोठ्या संख्येत उपस्थित होते. या कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात डॉ. ओमप्रकाश पंचभाई व दुसऱ्या सत्रात डॉ. देवानंद खोब्रागडे यांनी मार्गदर्शन केले. आयोजनासाठी, अंकित मालखेडे, पवन कणोजे,धनंजय निखाडे, सलोनी सतनामे, प्रमोद समर्थ, रोशन जगताप, चेतन सोनटक्के, निखिल मोटघरे, प्रफुल्ल गवई, रूपेश तेलमोरे, विवेक खोब्रागडे, अभिषेक पाटील, रोहित राणे, अनिकेत कुंभरे, करिश्मा खोब्रागडे, पुजा बोबडे, संयोनी भारती, रोशनी तलेकर, प्रतीक्षा लोणारे, पायल राऊत, अंकिता माहुर्ले, आकांक्षा गावंडे, साक्षी सवाने, रितिका इंगोले, प्रज्ञा

# व्यक्तिमत्त्व विकासावर एकदिवसीय कार्यशाळा

**प्रतिनिधी, नागपूर**

**दीक्षाभूमी स्थित** डॉ. आंबेडकर महाविद्यालयात व्यक्तिमत्त्व विकासावर एकदिवसीय कार्यशाळा पार पडली. या कार्यशाळेचे उद्‌घाटन अभ्यासिका डॉ. प्रभज्योत कौर यांनी केले. अध्यक्षस्थानी कवी व लेखक तसेच मराठी विभाग प्रमुख प्रा. दीपककुमार खोब्रागडे होते.

व्यक्तिमत्त्व ही जीवनाची आयडेंटिटी असते. चांगले राष्ट्र आणि चांगला माणूस घडण्यासाठी व्यक्तिमत्त्वाचा सिंहाचा वाटा असतो. आजच्या विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास झाला तरच विचार करणारी माणसं सापडत नाही, अशी खंत डॉ. कौर यांनी आपल्या उद्‌घाटनपर भाषणातून व्यक्त केली. त्यांनी व्यक्तिमत्त्व विकासासाठी अनेक आधारभूत मूलतत्त्वे सांगितली. व्यक्तिमत्त्व हा समाजाचा आरसा असतो. त्यासाठी उत्तम गुण आजच्या काळातच असणारी माणसेच वर्तमानात टिकत असतात, असे त्या म्हणाल्या. त्यांनी पॉवर पाईंट प्रेझेंटिशनद्वारे व्यक्तिमत्त्व विकासाची या कार्यशाळेत वेगवेगळी उदाहरणे दिली.




चांगला लेखकच उत्तम साहित्य कलाकृती जन्माला घालतो. उत्तम लेखनासाठी उत्तम व्यक्तिमत्त्व असणे गरजेचे असते, असे अध्यक्षीय भाषणातून प्रा. दीपककुमार खोब्रागडे यांनी सांगितले. आजच्या विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास झाला तरच तो या देशाचे उज्ज्वल भवितव्य राहील, असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. प्रास्ताविक मराठी वाङ्मय मंडळाचे संयोजन प्रा. रवींद्र तिरपुडे यांनी केले. संचालन प्रा. वैशाली धनविजय यांनी केले, तर आभार अंकित मालखेडे यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील विविध विभागाचे प्राध्यापक व सर्व ज्ञानशाखेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकसत्ता Wed, 12 September 2018 epaper.loksatta.com/c/32102643

# व्यक्तिमत्त्व ही जीवनाची खरी ओळख : डॉ. कौर



**नागपूर** : व्यक्तिमत्त्व ही जीवनाची खरी ओळख असते. चांगले राष्ट्र आणि चांगला माणूस घडण्यासाठी व्यक्तिमत्त्वाचा सिंहाचा वाटा असतो, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध अभ्यासिका डॉ. प्रभज्योत कौर यांनी केले. डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथे व्यक्तिमत्त्व विकासावर एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. या वेळी कौर बोलत होत्या. उद्‌घाटन डॉ. प्रभज्योत कौर यांनी केले. अध्यक्षस्थानी मराठी विभागप्रमुख प्रा. दीपककुमार खोब्रागडे होते. प्रा. खोब्रागडे म्हणाले, चांगला लेखकच उत्तम साहित्य, कलाकृती जन्माला घालतो. उत्तम लेखनासाठी उत्तम व्यक्तिमत्व असणे गरजेचे आहे. प्रास्ताविक प्रा. रवींद्र तिरपुडे यांनी केले. संचालन प्रा. वैशाली धनविजय यांनी केले, तर अंकित मालखेडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यशस्वितेसाठी अंकित मालखेडे, पवन कनोजे, धनंजय निखाडे, सलोनी सतनामे, प्रमोद समर्थ, रोशन जगताप, चेतन सोनटक्के, निखिल मोटघरे, प्रफुल्ल गवई, रूपेश तेलमोरे, विवेक खोब्रागडे, अभिषेक पाटील, रोहित राणे, अनिकेत कुंभरे, करिश्मा खोब्रागडे, पूजा बोबडे आदींनी सहकार्य केले.

नव राष्ट्र

# बंदिस्त इतिहास समजण्यासाठी मोडी लिपी शिका

**नवीनकुमार माळी यांचे प्रतिपादन**

**नागपूर.** कला, साहित्य, भाषा यांचा अभ्यास तर केला पाहिजेच परंतु खरा इतिहास जाणून घ्यायचा असेल तर मोडी लिपीशिवाय आज कुठलाही पर्याय नाही. महाराष्ट्राच्या उज्ज्वल इतिहासाचा वारसा संपन्न आहे. आपल्या संस्कृतीची मर्मस्थाने मोडी लिपीमध्येच आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळातील सर्व व्यवहार व कागदपत्रे मोडी लिपिमध्ये बंदिस्त आहे. त्यामुळे मोडी लिपीचा अभ्यास करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन मोडी लिपी अभ्यासक नविनकुमार माळी यानी केले.



मोडी लिपीमध्ये या देशाचा खरा इतिहास आहे, तो वाचता यावा व आजच्या पिढीला सत्य कळावे यासाठी जागतिक मोडी लिपी समिती व डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन विद्यार्थी, प्राध्यापक व नागरिकांसाठी आयोजित करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन मोडी लिपी अभ्यासक नविनकुमार माळी यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून मोडी लिपी अभ्यासक भुपेश पाटील होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी विभाग प्रमुख प्रा. दीपककुमार खोब्रागडे होते. यावेळी नविनकुमार माळी म्हणाले, शिवाजी महाराजांचा इतिहास हा मोडी लिपीमध्ये आहे. आज इतिहासकारांमध्ये विविध मतप्रवाह आहेत परंतु मोडी लिपीचे अध्ययन करून घेतले तर खरा इतिहास आपल्याला कळेल. आज जगतिकीकरणाचे युग आहे. यावेळी सहभागी प्रशिक्षार्थी व विद्यार्थ्यांना अवघ्या 3 तासात मोडीलिपीची मुळाक्षरे शिकविली. कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण करतांना मराठी विभाग प्रमुख प्रा. दीपककुमार खोब्रागडे म्हणाले, मोडी लिपी आणि धम्म लिपीतच या देशाची खरी संस्कृती आहे. अशोकाचे शिलालेख वाचता यावे यासाठी धम्म लिपी अतिशय महत्वाची असल्याचे यांनी संगितले.

मोडी लिपी व धम्म लिपी आपल्या संस्कृतीची तसेच इतिहासाची खरी भाषा असून तीच आपल्या ज्ञानसंवर्धनासाठी महत्वाची आहे. सरकारने पुढाकार घेऊन या लिपीचे तसेच जुन्या दस्तावेजाचे संरक्षण करावे असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. या कार्यशाळेचे प्रास्ताविक प्रा. डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी केले. संचालन प्रा. वैशाली धनविजय यांनी तर आभार अंकित मालखेडे यांनी केले. या कार्यशाळेसाठी पवन कनोजे, सौरभ मेश्राम, धनंजय निखाडे, हिलोरी भांगे, अश्विनि शिंदे, काजल पडोळे, स्वप्नील पाटील, प्रफुल गवई यांनी परिश्रम घेतले.या कार्यशाळेला बरेच जाणकार नागरिक, प्राध्यापक वर्ग व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

Orange City Plus Edition
10 Jan, 2019 Page No. 2

# बंदिस्त इतिहास समजण्यासाठी मोडीलिपी शिका

## मोडीलिपी अभ्यासक नवीनकुमार माळी यांनी दिले धडे

लोकशाही वार्ता/नागपूर

कला, साहित्य, भाषा यांचा अभ्यास तर केला पाहिजेच. परंतु खरा इतिहास जाणून घ्यायचा असेल तर मोडीलिपीशिवाय आज कुठलाही पर्याय नाही. महाराष्ट्राच्या उज्ज्वल इतिहासाचा वारसा संपन्न आहे. आपल्या संस्कृतीची मर्मस्थाने मोडीलिपीमध्येच आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळातील सर्व व्यवहार व कागदपत्रे सर्व मोडीलिपीमध्ये बंदिस्त आहे. त्यामुळे मोडीलिपीचा अभ्यास करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन मोडीलिपी अभ्यासक नवीनकुमार माळी यांनी केले.

मोडीलिपीमध्ये या देशात खरा इतिहास आहे, तो वाचता यावा व आजच्या पिढीला सत्य कळावे यासाठी जागतिक मोडीलिपी समिती व डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आज, ७ जानेवारी रोजी रविवारला एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन विद्यार्थी, प्राध्यापक व नागरिकांसाठी आयोजित करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन मोडीलिपी अभ्यासक नवीनकुमार माळी यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून मोडीलिपी अभ्यासक भूपेश पाटील होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी विभागप्रमुख प्रा. दीपककुमार खोब्रागडे होते.



कार्यक्रमाच्या उद्घाटनीय भाषणात नवीनकुमार माळी म्हणाले, शिवाजी महाराजांचा इतिहास हा मोडीलिपीमध्ये आहे. आज इतिहासकारांमध्ये विविध मतप्रवाह आहेत. परंतु मोडीलिपीचे अध्ययन करून घेतले तर खरा इतिहास आपल्याला कळेल. आज जगतिकीकरणाचे युग आहे. यावेळी सहभागी प्रशिक्षार्थी व विद्यार्थ्यांना अवघ्या ३ तासांत मोडीलिपीची मुळाक्षरे शिकविली.

भूपेश पाटील म्हणाले, खरा आणि जिवंत इतिहास जाणून घ्यायचा असेल तर तत्कालीन लिपीसारखा जवळचा मित्र दुसरा कोणीही नाही. मोडीलिपा असो की धम्मलिपी याबाबतची जागरूकता वाढली पाहिजे. जुने दिवाणी मामले, जातपडताळणीचे प्रकरणे यासाठी न्यायलयीन प्रक्रियेतसुद्धा मोडीलिपीची अत्यंत महत्त्वाची भूमिका आहे. मोडीलिपी अवगत नसल्यामुळे इतिहास कसं चुकीचा लिहिला गेला तसेच न्यायलयीन प्रक्रियेत कसे अडथळे आलेत, याची विविध उदाहरणे दिली. देशाची संस्कृती जाणून घेण्यासाठी मोडीलिपीशिवाय दूसरा मार्ग नाही, असे ते याप्रसंगी म्हणाले.

कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण करताना मराठी विभाग प्रमुख प्रा. दीपककुमार खोब्रागडे म्हणाले, मोडीलिपी आणि धम्मलिपीतच या देशाची खरी संस्कृती आहे. अशोकाचे शिलालेख वाचता यावे यासाठी धम्मलिपी अतिशय महत्त्वाची असल्याचे यांनी संगितले. मोडीलिपी व धम्मलिपी आपल्या संस्कृतीची तसेच इतिहासाची खरी भाषा असून तीच आपल्या ज्ञानसंवर्धनासाठी महत्त्वाची आहे. सरकारने पुढाकार घेऊन या लिपीचे तसेच जुन्या दस्तऐवजाचे संरक्षण करावे, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. या कार्यशाळेचे प्रास्ताविक प्रा. डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी केले. संचालन प्रा. वैशाली धनविजय तर आभार अंकित मालखेडे यांनी केले. या कार्यशाळेसाठी पवन कनोजे, सौरभ मेश्राम, धनंजय निखाडे, हिलोरी भांगे, अश्विनी शिंदे, काजल पडोळे, स्वप्नील पाटील, प्रफुल्ल गवई यांनी सहकार्य केले. या कार्यशाळेला बरेच जाणकार नागरिक, प्राध्यापक वर्ग व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## नवीनकुमार माळी यांचे प्रतिपादन

# संस्कृतीची मर्मस्थाने मोडीलिपीत

म.टा. प्रतिनिधी, नागपूर

'शिवाजी महाराजांचा इतिहास हा मोडी लिपीमध्ये आहे. आज इतिहासकारांमध्ये विविध मतप्रवाह आहेत, परंतु मोडी लिपीचे अध्ययन करून घेतले तर खरा इतिहास आपल्याला कळेल. कला, साहित्य, भाषा यांचा अभ्यास तर केला पाहिजेच, शिवाय खरा इतिहास जाणून घ्यायचा असेल तर मोडी लिपीशिवाय आज कुठलाही पर्याय नाही. आपल्या संस्कृतीची मर्मस्थाने मोडी लिपीमध्येच आहेत', असे प्रतिपादन जागतिक कीर्तीचे मोडीलिपी अभ्यासक नवीनकुमार माळी यांनी केले.

मोडी लिपीमध्ये या देशात खरा इतिहास आहे. तो वाचता यावा व आजच्या पिढीला सत्य कळावे यासाठी जागतिक मोडीलिपी समिती व डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन विद्यार्थी, प्राध्यापक व नागरिकांसाठी करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन माळी यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून मोडीलिपी अभ्यासक भूपेश पाटील होते. अध्यक्षस्थानी मराठी विभाग प्रमुख प्रा. दीपककुमार खोब्रागडे होते. मोडीलिपी अवगत नसल्यामुळे इतिहास कसा चुकीचा लिहिला गेला तसेच न्यायालयीन प्रक्रियेत कसे अडथळे आलेत, याची विविध उदाहरणे माळी यांनी दिली.

प्रास्ताविक प्रा. डॉ. रवींद्र तिरपुडे, संचालन प्रा. वैशाली धनविजय यांनी केले. आभार अंकित मालखेडे यांनी मानले. यशस्वितेसाठी पवन कनोजे, सौरभ मेश्राम, धनंजय निखाडे, हिलोरी भांगे, अश्विनी शिंदे, काजल पडोळे, स्वप्नील पाटील, प्रफुल्ल गवई यांनी परिश्रम घेतले.




कार्यशाळेत मार्गदर्शन करताना मोडीलिपीचे अभ्यासक नविनकुमार माळी. व्यासपीठावर उपस्थित भूपेश पाटील, प्रा. दीपककुमार खोब्रागडे आदी.

---

# मोडी लिपीवर कार्यशाळा

◆ नागपूर, ८ जानेवारी

देशाचा खरा इतिहास मोडी लिपीमध्ये आहे, तो वाचता यावा व आजच्या पिढीला सत्य कळावे, यासाठी जागतिक मोडी लिपी समिती व डॉ. आंबेडकर कॉलेज दीक्षाभूमी यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय कार्यशाळा नुकतीच पार पडली. या कार्यशाळेचे उद्घाटन जागतिक कीर्तीचे मोडी लिपी अभ्यासक नवीनकुमार माळी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून मोडी लिपी अभ्यासक भुपेश पाटील तर अध्यक्षस्थानी मराठी विभागाचे प्रमुख प्रा. दीपककुमार खोब्रागडे होते.




नवीनकुमार माळी म्हणाले, शिवाजी महाराजांचा इतिहास मोडी लिपीतच आहे. आज इतिहासकारांमध्ये विविध मतप्रवाह दिसतात. परंतु, मोडी लिपीचे अध्ययन केल्यास खरा इतिहास आपल्याला कळेल. आज जागतिकीकरणाचे युग आहे. कला, साहित्य, भाषांचा अभ्यास तर केला पाहिजेच शिवाय खरा इतिहास जाणून घ्यायचा असेल तर मोडी लिपीशिवाय आज कुठलाही पर्याय नाही. महाराष्ट्राच्या उज्ज्वल इतिहासाचा वारसा संपन्न आहे. आपल्या संस्कृतीची मर्मस्थाने मोडी लिपीमध्येच आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळातील सर्व व्यवहार व कागदपत्रे मोडी लिपीमध्ये बंदिस्त आहे. त्यामुळे या लिपीचा अभ्यास करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रमुख अतिथी भुपेश पाटील म्हणाले, खरा आणि जिवंत इतिहास जाणून घ्यायचा असेल तर तत्कालीन लिपीसारखा जवळचा मित्र दुसरा कोणीही नाही. मोडी लिपी असो की धम्म लिपी, याबाबत जागरूकता वाढली पाहीजे. जुने दिवाणी मामले, जातपड्ताळणीची प्रकरणे यासाठी न्यायालयीन प्रक्रियेतही मोडी लिपीची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. मोडी लिपी अवगत नसल्याने इतिहास कसा चुकीचा लिहिला गेला तसेच न्यायालयीन प्रक्रियेत कसे अडथळे आलेत, याची विविध उदाहरणे त्यांनी दिली. अध्यक्षीय भाषणात प्रा. खोब्रागडे म्हणाले, मोडी लिपी आणि धम्म लिपीतच या देशाची खरी संस्कृती आहे. अशोकाचे शिलालेख वाचता यावे, यासाठी धम्म लिपी अतिशय महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले. मोडी लिपी व धम्म लिपी आपल्या संस्कृतीची तसेच इतिहासाची खरी भाषा असून तीच आपल्या ज्ञानसंवर्धनासाठी महत्त्वाची आहे. सरकारने पुढाकार घेऊन या लिपीचे तसेच जुन्या दस्तऐवजांचे संरक्षण करावे, असे आवाहन त्यांनी केले. प्रास्ताविक डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी, तर सूत्रसंचालन प्रा. वैशाली धनविजय यांनी केले. आभार अंकित मालखेडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी पवन कनोजे, सौरभ मेश्राम, धनंजय निखाडे, हिलोरी भांगे, अश्विनी शिंदे आदींनी सहकार्य केले.

महाराष्ट्र टाइम्स नागपूर । गुरुवार, २८ फेब्रुवारी २०१९

# मराठीमुळेच महाराष्ट्राची संस्कृती टिकून

## प्रा. दीपक खोब्रागडे यांचे प्रतिपादन

म.टा. प्रतिनिधी, नागपूर

'मराठी आपल्या जगण्याची सामाजिक भाषा आहे. महाराष्ट्राचा खरा इतिहास मराठीच असल्यामुळे आपल्या संस्कृतीचे वैभव आपल्याला आपल्याच भाषेतूनच पाहता येते. इंग्रजी, फ्रेंच व चायनीज भाषिक आपले गौरव दिवस साजरे करीत नाहीत. कारण ती भाषा त्यांच्या शैक्षणिक न्यायालयीन व राजकीय व्यवहाराची भाषा आहे. मराठी भाषिक आज इंग्रजी व हिंदी भाषेकडे वळल्यामुळे मराठीची दुर्दशा होत आहे', असे प्रतिपादन दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख प्रा. दीपक खोब्रागडे यांनी केले. महाविद्यालयातील मराठी वाङ्मय मंडळाच्यावतीने आयोजित मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाला महाविद्यालयातील मराठी वाङ्मय मंडळाचे संयोजक प्रा. डॉ. रवींद्र तिरपुडे, प्रा. वैशाली धनविजय, डॉ. देवानंद खोब्रागडे, प्रा. ओमप्रकाश पंचभाई, अंकित मालखेडे यांची उपस्थिती होती. प्रा. खोब्रागडे म्हणाले, 'आज मराठीचा डांगोरा पिटणारेच आपल्या मुलांना इंग्रजी शाळेत टाकतात. परदेशात शिक्षणासाठी पाठवितात. अशा लोकांचा आपल्याच भाषेवरचा विश्वास उडत चालला असल्याचेच हे चिन्ह आहे', अशी खंतही त्यांनी यावेळी व्यक्त केली. कायद्याची व कला, सायन्स, कॉमर्स या सर्व ज्ञानशाखांची भाषा जोपर्यंत मराठी होत नाही, तोपर्यंत मराठी भाषेला भवितव्य नसल्याचे त्यांनी सांगितले.


मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रमात संबोधित करताना प्रा. डॉ. दीपककुमार खोब्रागडे. मंचावर प्रा.डॉ. रवींद्र तिरपुडे, अंकित मालखेडे.

प्रास्ताविकात प्रा. डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी, मराठी भाषेतील कुसुमाग्रजांच्या योगदानाबाबत सविस्तर माहिती दिली. प्रा. वैशाली धनविजय यांनी विद्यार्थ्यांसमोर मराठी भाषा दिवसानिमित्त कविता व गझल सादर केल्या. सूत्रसंचालन अंकित मालखेडे यांनी केले, तर पवन कनोजे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# मराठीमुळेच महाराष्ट्राची संस्कृती टिकून

## प्रा. दीपककुमार खोब्रागडे यांचे प्रतिपादन

लोकशाही वार्ता/ नागपूर

इंग्रजी व हिंदी भाषेकडे वळल्यामुळे आज मराठीची दुर्दशा होत आहे. मराठीचा डांगोरा पिटणारेच आपल्या मुलांना इंग्रजी शाळेत शिकवितात व परदेशात शिक्षणासाठी पाठवितात. अशा लोकांचा आपल्याच भाषेवरचा विश्वास उडत चालला असल्याची खंत साहित्यिक व मराठी विभाग प्रमुख प्रा. दीपककुमार खोब्रागडे यांनी व्यक्त केली.

डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर येथे दि.२७ फेब्रुवारी रोजी मराठी भाषा गौरव दिवस साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने घेण्यात आला. याप्रसंगी मराठी वाङ्मय मंडळाचे संयोजक डॉ. रवींद्र तिरपुडे, प्रा. वैशाली धनविजय, डॉ. देवानंद खोब्रागडे, प्रा. ओमप्रकाश पंचाभाई उपस्थित होते. प्रा. दीपककुमार खोब्रागडे म्हणाले, मराठी ही आपल्या जगण्याची सामाजिक भाषा आहे. महाराष्ट्राचा खरा इतिहास मराठीच असल्यामुळे आपल्या संस्कृतीचे वैभव आपल्याला भाषेतूनच पाहता येते.



इंग्रजी, फ्रेंच व चायनीज भाषिक आपले गौरव दिवस साजरे करीत नाही. कारण ती भाषा त्याच्या शैक्षणिक न्यायालयीन व राजकीय व्यवहारची भाषा आहे. कायद्याची व कला, सायन्स, कॉमर्स या सर्व ज्ञानशाखेची भाषा जोपर्यंत मराठी होत नाही, तोपर्यंत मराठी भाषेला भवितव्य नसल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविक डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी केले. त्यांनी आपल्या भाषणातून कुसुमाग्रजांचे मराठी भाषेला कोणते योगदान आहे ते सविस्तर संगितले. प्रा. वैशाली धनविजय यांनी विद्यार्थ्यांसमोर मराठी भाषा दिवसानिमित्त कविता व गझल सादर केल्या. संचालन अंकित मालखेडे यांनी केले. तर आभार पवन कणोजे यांनी मानले. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

जाहीर नोटीस
प्रोसेस नं. १७०७ पेशी ता. ०७/०३/२०१९
कोर्ट विद्यमान मा. जिल्हा न्यायाधिश-७ वे व अतिरिक्त

कोर्ट विद्यमान आयुक्त,
कामगार नुकसान भरपाई कायदा, तथा मा.

कोर्ट विद्यमान आयुक्त,
कामगार नुकसान भरपाई कायदा, तथा मा.

# मराठी भाषा गौरव दिन साजरा

प्रतिनधी, नागपूर

डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्यावतीने मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम मराठी वाङ्मय मंडळाच्यावतीने घेण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन साहित्यिक व मराठी विभाग प्रमुख दीपकुमार खोब्रागडे यांनी केले. याप्रसंगी मराठी वाङ्मय मंडळाचे संयोजक डॉ. रवींद्र तिरपुडे, वैशाली धनविजय, देवानंद खोब्रागडे, ओमप्रकाश पंचभाई आणि अंतिक मालखेडे उपस्थित होते. प्रा. खोब्रागडे म्हणाले, महाराष्ट्राचा खरा इतिहास मराठीच असल्यामुळे आपल्या संस्कृतीचे वैभव आपल्याला भाषेतूनच पाहता येते. इंग्रजी, फ्रेंच व चीन भाषिक गौरव दिवस साजरा करीत नाही. कारण ती भाषा त्यांच्या शैक्षणिक न्यायालयीन आणि राजकीय व्यवहाराची भाषा आहे. मराठी भाषक आज इंग्रजी व हिंदी भाषेकडे वळल्यामुळे मराठीची दुर्दशा झाली आहे. मराठीसाठी डांगोरा पिटणारेच आपल्या मुलांना इंग्रजी शाळेत टाकतात, परदेशात शिक्षणासाठी पाठवतात, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. प्रास्ताविक डॉ. तिरपुडे यांनी केले. वैशाली धनविजय यांनी मराठी भाषा दिवसानिमित्त कविता व गझल सादर केली.

लोकसत्ता Sat, 02 March 2019
https://epaper.loksatta.com/c/37204142